दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक ३३९ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.५ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# खालापूर ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारत बांधकामास शासनाची प्रशासकीय मान्यता : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाची स्थापना करण्यासाठी शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली. ग्रामीण रुग्णालय उभारणीसाठी देवन्हावे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या मौजे दहिवली-बोरेटी येथे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गालगत शासकीय जागा प्रदान केली आहे. यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, रेल्वेमार्ग तसेच इतर राष्ट्रीय व राज्य मार्ग या दळवणळणाच्या सुविधांमुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण व नागरीकरण वाढत आहे. वाढत्या नागरीकरणासाठी आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी हे ग्रामीण रुग्णालय उभारण्यासाठी आग्रही भूमिका घेतली.

खालापूर तालुक्यातील औद्योगिकरणासह महड अष्टविनायक, गगनगिरी महाराज देवस्थान, अम्युझमेंट पार्क, एन.डीज् स्टुडिओ यासाठी या तालुक्यात नेहमी येणाऱ्या पर्यटक, भाविकांची संख्याही अलिकडच्या काळात वाढत आहे. परिणामी, आरोग्य सुविधांसाठी या ग्रामीण रुग्णालयाची उभारणी करणे गरजेचे होते. पालकमंत्री कु.तटकरे यांच्या आग्रही भूमिकेमुळे शासनाने ग्रामीण रुग्णालयाच्या मुख्य इमारत बांधकाम आराखड्यासह सुमारे १६.०८ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता



देऊन जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षमीकरणासाठी सहकार्य केले आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील आरोग्य सुविधांवर भर दिला जात आहे. त्यानुसार शासकीय आरोग्य यंत्रणांच्या बळकटीकरणातून प्रभावी आरोग्य सेवा सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी नेहमीच प्राधान्य दिले आहे व रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षमीकरणासाठी सहकार्य केले आहे. त्याबद्दल मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे विशेष आभार रायगडवासियांच्या वतीने पालकमंत्री कु.तटकरे यांनी व्यक्त केले आहेत.

'आरोग्य संपन्न-रायगड ही पालकमंत्री कु. तटकरे यांच्या संकल्पनेनुसार जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम, सुसज्ज व सर्व सोई-सुविधायुक्त होत असल्याची प्रचिती या खालापूर ग्रामीण रुग्णालयाच्या उभारणीस मिळालेल्या प्रशासकीय मान्यतेतून येत आहे.

# शेन वॉर्नचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



फिरकीचा जादूगार आणि ऑस्ट्रेलियाचा महान फिरकी गोलंदाज शेन वॉर्नचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. आपल्या फिरकीच्या तालावर दिग्गज फलंदाजांना नाचवणाऱ्या शेन वॉर्नने अखेर या जगाचा ५२व्या वर्षी निरोप घेतला. वॉर्न हा थायलंड येथील कोह सामुई येथे असताना त्याचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याची माहिती त्याच्या मॅनेजमेंट करणाऱ्या संस्थेने दिली आहे. त्यानंतर याबाबतचे पहिले वृत्त फॉक्स क्रिकेटने दिले आहे.

वॉर्नने आपल्या फिरकीच्या जोरावर क्रिकेट विश्व गाजवले होते. क्रिकेटच्या इतिहासातील शतकातील सर्वोत्तम चेंडू टाकण्याचा मानही वॉर्नला मिळाला होते. वॉर्नने इंग्लंडचा महान फलंदाज माइक गेटिंगला ज्यापद्धतीने बाद केले होते, ते पाहिल्यावर बऱ्याच जणांना विश्वास बसला नव्हता. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील कसोटी सामन्यात हा जादुई चेंडू वॉर्नने टाकला होता. त्यानंतर इंग्लंडचा माजी कर्णधार अँड्र्यू स्ट्रॉसलादेखील वॉर्नने तसेच बाद केले होते. पण आशिया खंडात, खासकरून भारतामध्ये वॉर्नची जादू भारतामध्ये जास्त दिसली नाही. शेन वॉर्न आणि सचिन तेंडुलकर यांच्यातील मैदानात चांगलेच युद्ध रंगलेले पाहायला मिळायचे आणि यामध्ये सचिननेच जास्तवेळा बाजी मारल्याचे पाहायला मिळाले. वॉर्नकडे नेतृत्व करण्याची चांगली क्षमता होती आणि ते त्याने आयपीएलमध्येही दाखवून दिले. पहिल्याच आयपीएलमध्ये आपल्या नेतृत्वाखाली वॉर्नने राजस्थान रॉयल्सला जेतेपद पटकावून दिले होते. एक कर्णधार आणि मार्गदर्शक कसा असावा, याचा उत्तम वस्तुपाठ वॉर्नने यावेळी दाखवला होता. वॉर्नने क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावरही तो राजस्थानच्या संघाशी संलग्न होता.

# विठ्ठल नगर व कोतवाल नगर येथील तरुणांचा शिवसेनेत पक्षप्रवेश



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नगरपरिषद हद्दीतील विठ्ठल नगर आणि कोतवाल नगर मधील तरुणांनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला आहे.

नगरसेविका संचिता पाटील, माजी नगरसेवक संतोष पाटील, माजी नगरसेवक मुकेश पाटील, मुकुंद मोधळे, प्रशांत पाटील, अरुण निघोजकर, शफिक मुल्ला यांच्या उपस्थित यश बडेकर, सुरज म्हसे, वेद मोरे, राज गोडे, प्रणित नागे, निशांत घरत, ज्योतिर्भय शेगर, सिद्धांत मोरे, यश सुपे, हितेश गायकवाड, अथर्व कटारे या विठ्ठल नगर व कोतवाल नगर मधील तरुणांनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला.

# नामांकित मोबाईलची हुबेहूब नक्कल करून विक्री करणाऱ्या विरोधात कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आयफोन ॲपल मोबाईलचे साहित्य व मोबाईल कव्हर इत्यादी उत्पादनाचे हुबेहूब नक्कल व रंग संगती असलेली तसेच कोणत्याही स्वामीत्व हक्काचा कायदेशीर अधिकार नसताना उत्पन्नाचा विक्री व साठा करून संबंधित कंपनीचे स्वामित्व हक्काचे उल्लंघन केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी ४ जणांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली आहे.

या संदर्भात कुंदन बेलोसे यांनी कॉपीराईट ॲक्ट अंतर्गत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. त्यानुसार वपोनि विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संतोष शेटे, सपोनि शिवाजी हुलगे, पो.उप.नि.मनोज महाडिक, पो.ना.रवींद्र पारधी, पो.ना.युवराज म्हात्रे आदींच्या पथकाने पनवेल रेल्वे स्टेशन समोरील एन.के.हेरिटेज त्याचप्रमाणे मालधक्का परिसर व पटवर्धन हॉस्पिटलच्या मागे आदी ठिकाणी छापे टाकून चार जणांना ताब्यात घेतले आहे व त्यांच्याकडून ३ लाख ४४ हजार ४५० रुपये किंमतीचे ॲपल कंपनीचे मोबाईल कव्हर, ॲपल कंपनीचे एअर पॉड, युएसबी केबल, मेघासेफ चार्जर, एअरपॉट केस इत्यादी ऐवज ताब्यात घेवून त्यांच्या विरोधात कॉपीराईट ॲक्ट १९५७ कलम ५१, ६३ प्रमाणे कारवाई केली आहे.



# तळोजा औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमुळे वायु प्रदुषण होत असल्याबाबत आ. प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमुळे वायु प्रदुषण होत असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे शासनाचे लक्ष वेधले असून तळोजा परिसरातील दुर्गंधीच्या तक्रारीच्या अनुषंगाने एकूण १३ उद्योगांवर कारवाई करण्यात आलेली आहे, असे लेखी उत्तर राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांमार्फत सोडण्यात येणा-या विषारी वायुमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे जानेवारी २०२२ मध्ये निर्दशनास आले असून या औद्योगिक वसाहतीतील ९४० कारखान्यांपैकी निम्म्याहून अधिक कारखान्यांतून रासायनिक सांडपाणी व विषारी वायुमुळे प्रदुषण होत असल्याने येथील नागरिकांना दमा, क्षयरोग, छातीत दुखणे तसेच डोळ्यांचे विकार होत असून मुलांच्या शारीरीक वाढीवर परिणाम होत आहे. राष्ट्रीय हरित लवादाने प्रदुषण करणारे कारखाने बंद करण्याचे आदेश दिले



असतानाही कारखानदार रात्री-अपरात्री विषारी वायु सोडत आहेत. या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या व प्रदुषणाला कारणीभूत ठरणाऱ्या कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे सुरु असलेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दाखल केला होता.

या प्रश्नावर राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, पनवेल महानगरपालिका यांच्या दिनांक २३ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रान्वये वायु प्रदूषणामुळे श्वसन दाह चे तसेच दम्याचे आजाराचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून आलेले नाहीत. मा. राष्ट्रीय हरित लवाद येथे दाखल झालेली याचिका (क्र. १२५/२०१८) ही प्रामुख्याने तळोजा औद्योगिक वसाहतीमधील सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा त्यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदान केलेल्या संमती पत्रामधील मानकांचे पालन करत नसल्याबद्दल आहे व सद्यस्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. सदर याचिकेमध्ये हवा/वायू प्रदुषणाबाबत बाबीचा समावेश नाही. तथापि, वायू प्रदुषणाच्या तक्रारीच्या संदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे रात्रीची गस्त घातली जाते व तळोजा औद्योगिक क्षेत्रातील उद्योग मंडळाने प्रदान केलेल्या संमती पत्रामधील हवा व जल प्रदूषण नियंत्रण विषयक अटी व शर्तींचे

.../२

## संक्षिप्त...

### मुंबईत ड्रीम्स मॉलला पुन्हा आग

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईतील भांडुप येथील ड्रीम्स मॉलला आज, शुक्रवारी रात्री पुन्हा भीषण आग लागली. या घटनेची माहिती मिळताच, पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान बंबांसह घटनास्थळी पोहोचले. वर्षभरापूर्वीच या मॉलमधील तिसऱ्या मजल्यावरील कोविड रुग्णालयाला लागलेल्या आगीत ११ जणांचा बळी गेला होता.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, भांडुप येथील ड्रीम्स मॉलला रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास आग लागली. आगीची माहिती मिळाल्यानंतर पोलीस यंत्रणा आणि अग्निशमन यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहोचली. अग्निशमन बंबांच्या साह्याने कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. गेल्या वर्षी मार्च महिन्यातच या मॉलमधील कोविड समर्पित रुग्णालयात आग लागली होती. यात ११ रुग्णांचा बळी गेला होता. गेल्या वर्षभरापासून हा मॉल बंद आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ड्रीम्स मॉलमध्ये पुन्हा आग लागली. आज रात्री साधारण साडेआठच्या सुमारास ही आग लागली. आगीचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

# अधिवेशनात नैनाचा प्रश्न मांडणार : आ.जयंत पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या सुरू असलेल्या अधिवेशनात नैनाचा प्रश्न मांडणार असून शेतकऱ्यांवर अन्याय होत असेल तर रस्त्यावर उतरावे लागेल आसा ईशारा आमदार जयंत पाटिल यानी दिला. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये नैना प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या आयोजित सभेत ते बोलत होते. या सभेला आमदार जयंत पाटील, आमदार बालाराम पाटिल, जे एम म्हात्रे, जी आर पाटिल, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, राजेश केणी, गणेश कडु यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



शेतकरयावर लादलेली नैना ही कशी फायद्याची नाही याची माहिती तज्ञ अतुल म्हात्रे यांनी प्रात्यक्षिकाद्वारे पडद्यावरती दाखवले. यानंतर शेतकऱ्यांना संबोधित करताना जयंत पाटील यांनी सांगितले की, सर्व शेतकऱ्यांनी व सर्व गावांनी एकत्र येणे गरजेचे असून नैनाला विरोध करायचा आहे. आमच्या जमिनी आम्ही विकसित करू आणि ग्रामपंचायतीचे अधिकार काढून घेऊ नये, शेतकर्यांचे प्रश्न अधिवेशनात लक्षवेधीद्वारे मांडणार आहे असे जयंत पाटिल यानी सांगितले. नैनाला विरोध करण्यासाठी या पुढे मोठे आंदोलन लवकरच उभारू त्यासाठी राजू शेट्टी यांच्यासह दिल्लीचे शेतकऱ्यांचे नेते पनवेलला

.../२

# उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी उपोषणास बसलेल्या विना वेतन कर्मचाऱ्यांचा प्रश्न ४८ तासात सोडविला



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथे बसलेल्या उपोषणकर्त्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न महाराष्ट्र राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी निकाली काढला आहे.

शांतिनिकेतन पॉलिटेक्निक कॉलेज नविन पनवेल तेथील कर्मचारी गेले ७ महिने विना वेतन काम करत होते. संस्था चालकाच्या खोट्या आश्वासनांना कंटाळून २४ फेब्रुवारी पासून कर्मचारी आमरण उपोषणास बसले होते. यावेळी जिल्हा प्रमुख शिरिष घरत यांच्या आदेशाने हि बातमी जेव्हा नविन पनवेल शिवसेना पदाधिकारी आणि शिवसेना प्रणित शिक्षकसेनेला समजली तेव्हा शहर प्रमुख यतिन देशमुख आणि शहर संघटिका सौ. अपूर्वा प्रभू यांनी तात्काळ उपोषणा ठिकाणी धाव घेतली. संघटीका सौ. अपूर्वा प्रभू यांनी लगेच उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्याशी संपर्क करून उपोषण करत्या कर्मचाऱ्यांची सर्व सत्य परिस्थिती त्यांना कळवली

.../२


# कर्नाळा अभयारण्यात आरटीओची सेफ्टी व्हेईकलच्या माध्यमातून वाहनांवर राहणार नजर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुंबई -गोवा महामार्गावरील पनवेलनजीक असलेल्या कर्नाळा अभयारण्यातून आपल्या वाहनातून प्रवास करणार असाल तर सा-वधानता बाळगा,कारण तुमच्या वाहनांना नियंत्रित ठेवण्यासाठी आरटीओची नजर तुमच्यावर असणार आहे.वाऱ्याच्या वेगाने धावणाऱ्या वाहनांवर आता रोड सेफ्टी व्हेईकलच्या माध्यमातून नजर ठेवली जाणार आहे.यासाठी आरटीओने विशेष उपाययोजना सुरु केलेली आहे.

मुंबई -गोवा महामार्गाचे चौपदरीकरण झाल्याने कर्नाळा परिसराचे रुपचं पालटलंय. कर्नाळा हे पक्षी अभयारण्य म्हणून ओळखले जाते.दररोज या परिसरात रायगड, ठाणे, मुंबई, पुण्यासह राज्याच्या कानाकोपर्यातून हजारो पर्यटक येत असतात. एक दिवसाची पिकनीक पॉईंट म्हणूनही कर्नाळाकडे पाहिले जाते. सध्या महामार्ग झाल्याने या मार्गावरुन प्रवास करताना वाहन चालक सुसाट धावत असतता. अनेकदा या सुसाट वेगाने अपघात घडून निष्पाप जीवही गेलेले आहे. शिवाय या परिसरातील पशु, पक्षी, विशेष करुन विविध प्रकारची माकडे, वानरे या सुसाट वेगाला बळी पडलेली आहेत. यामुळेच आरटीओने आता या महामार्गावरील सुसाट वाहनांना आवर घालण्यासाठी पाऊले उचलली आहेत. यासाठी परिवहन विभागाने आरटीओसाठीरोड सेफ्टी व्हेईकल उपलब्ध करुन दिलेली आहे.

या वाहनांच्या माध्यमातून सुसाट धावणार्या वाहनांवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाईही केली जाणार आहे. तेव्हा सावध राहून आपली वाहने चालवा. अन्यथा रोड सेफ्टी व्हेईकल तुमची शिकार केल्याशिवाय राहणार नाही. वाहनांना वेगमर्यादा घालून देणारी अधिसूचना वाहतूक पोलिस विभागाने जारी केली आहे. रस्त्यांवरील अप-घात रोखण्यासाठी विविध रस्त्यांची भौगोलिक



परिस्थिती, भूप्रदेश, घाट रस्ते, वळण रस्ते, समतल रस्ते, चढउतार आदी बाबींचा विचार करून महत्तम वेग मर्यादा निश्चित करणे आवश्यक होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. वेगमर्यादा न पाळणाऱ्या वाहनांवर कारवाई होत आहे. महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांना ठरवून दिलेल्या नियंत्रित वेगमर्यादा वाहनांनी ओलांडल्या तर तपासासाठी फिरत असलेल्या रोड सेफ्टी व्हेहिकल (रस्ता सुरक्षा वाहन) मधील अधिकारी त्या त्या वाहनांचे फोटो काढून वाहनाच्या नोंदणी क्रमांकावर चलान पाठवून देतात. नियंत्रित वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनांना दोन हजार रूपयांचे चलान आकारले जाते.

# १५ वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीस तळोजा पोलिसांनी घेतले ताब्यात





**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथे राहणाऱ्या एका १५ वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या आर–ोपीस राजस्थान येथील जि.बारा येथून ताब्यात घतले आहे.

तळोजा परिसरात राहणारी एका १५ वर्षीय मुलीचे अपहरण झाल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित आरोपीचे मोबाईल कॉल डिटेक्ट व गुप्त बातमीदाराद्वारे अधिक माहिती घेतली असता सदर आरोपी नामे अरविंद मेघवाल याने तिला अंता पोलीस ठाणे, जिल्हा : बारा, राजस्थान या भागात पळवून नेल्याचे समजले. त्यानुसार सहा.पो.नि.राजेंद्र जाधव, पो.ना.विजय पाटील, अनिल जाधव आदींच्या पथकाने सदर ठिकाणी छापा टाकून त्या आरोपीला मुलीसह ताब्यात घेतले आहे. व तळोजा येथे आणून तिच्या कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# एस. टी. सेवा पूर्ववत करणासाठी म्हसळा तालुका भाजपच्या वतीने तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गरीबांना दैनंदिन व्यवहारात एस.टी. प्रवास महत्त्वाचा असताना या आंदोलना बाबतीत साधारण ५ महीने होत आहेत, यावर अद्याप निर्णय घेतला नाही. शासकीय यंत्रणा अथवा न्यायालयाने यावर तातडीने तोडगा काढावा नाहीतर जनता उद्रेक होईल याला जबाबदार राज्य शासन राहील तरी तातडीने एसटी सेवा पूर्ववत् सुरू करावी. म्हसळा तालुक्यातील ८४ गावातील नागरिक, विद्यार्थी म्हसळा शहारामध्ये नेहमी शासकीय कामे, शिक्षणासाठी येत असतात परंतु एस. टी सेवा बंद असल्यामुळे त्यांना प्रायव्हेट गाडी वाल्याना दुप्पट रक्कम देऊन प्रवास करावा लागत आहे. या करीता भारतीय जनता पार्टी म्हसळा तालुका च्या वतीने तहसीलदार यांना निवेदन दिले. यावेळी तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, तालुका सरचिटणीस महेश पाटील, तालुका सरचिटणीस सुनील शिंदे, तालुका चिटणीस सुनील विचारे, तालुका चिटणीस मनोहर जाधव, सुबोध पाटील, राजेंद्र चव्हाण व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शुश्रुषा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलतर्फे आरोग्य शिबिर संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रामपंचायत वलप आणि शुश्रुषा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल पनवेलचे जनसंपर्क अधिकारी कुमार लोंढे यांच्या प्रयत्नाने नवी मुंबईसह रायगड जिल्ह्यात गावोगावी मेडिकल कॅम्पचे आयोजन केले जाते. नुकतेच पनवेल तालुक्यातील वलप ग्रामपंचायतीत गरजू रुग्णांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते, यावेळी जवळजवळ दोनशे रुग्णांची तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थितांना महात्मा फुले जनकल्याण आरोग्य योजना व इतर योजनांबद्दल माहिती दिली. तर डॉ.संजय तर्लेकर यांनी हॉस्पीटलमध्ये शासकीय योजनेद्वारे होत असलेल्या आजाराबाबत माहिती दिली. यावेळी शेकापचे पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनंतराव पाटील, रायगड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस तुषार पाटील, सरपंच जयमाला पाटील, उपसरपंच मनोज पाटील, ग्रामसेविका रेश्मा रुपम गावंड, गावचे पोलीस पाटील मारुती पाटील. जेष्ठ कार्यकर्ते राजाराम पाटील, हरिचंद्र पाटील, तंटामुक्त अध्यक्ष बंडू पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गाणी मधील कोंढे तर्फे श्रीवर्धन बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायत गाणी मधील कोंढे तर्फे श्रीवर्धन येथील बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात करण्यात आली आहे. रायगड जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यात जिल्हा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात विकास कामे राबविण्यात येत आहेत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत विविध कामे नागरिकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून गावांमध्ये विविध विकास कामे होण्याबरोबरच लाभार्थींना रोजगार उपलब्ध केला जात आहे. या योजने नुसार १०० दिवस काम नागरिकांना दिले जात आहे. रोजगार हमी तील कामे गावाच्या जवळ दिली जातात.

तसेच कृषी विभागात फळबाग, शेती ची दुरुस्ती, बांध दुरुस्ती , शोष खड्डे, विहीर निर्मिती, रस्ते दुरुस्ती , गांडूळ खत प्रकल्प, वन विभागातील झाडांना पाणी घालणे, पेयजल जलस्रोतां मधील गाळ काढणे अशा विविध कामांद्वारे ग्राम विकासाला चालना दिली जात आहे .

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत २३७ प्रकारच्या कामाची उपलब्धता केली जाते. गावातील जॉब कार्ड धारकांना रोजगारात प्राधान्य दिले जाते. प्रतिदिन २४८ याप्रमाणे रोजगार हमीवर काम करणाऱ्या रोजगाराला मजुरी दिली जाते.

ग्रामपंचायत गाणी येथे १८ नागरिक गाळ काढण्याचे काम करत आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमुळे गावातील नागरिकांना रोजगार सोबत गाव विकासाला व गाव समृद्धीचा फायदा होता आहे.

# सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळावा 'न भूतो न भविष्यती' असा करणार : माजी विद्यार्थ्यांचा निर्धार

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'२०२४ साली ५० वर्षे होत आ–हेत. त्यावेळी माजी विद्यार्थ्यांचा सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळावा 'न भूतो न भविष्यती असा करण्यासाठी सर्वांनी तन मन आणि धनाने सहभागी व्हावे. या स्नेह मेळाव्यात माजी विद्यार्थीनी कसे सहभागी होतील असा प्रयत्न सर्वांनी करावा. आपण ज्या शाळेत शिकून मोठे झालोत त्या शाळेलाही आपल्या वर्गाची कायम आठवण रहावी म्हणून एक वेगळा उपक्रम करण्याचा निर्धार' माजी विद्यार्थ्यांनी केला आहे.

कर्जत भिसेगाव खिंडी नजीक असलेल्या ज्यूरासिक फार्म वर अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या १९७४ – ७५ या वर्षीच्या जुन्या अकरावीतील विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. उच्च पदावर अधिकारी म्हणून काम केलेल्या गजानन काळे या माजी विद्यार्थ्याच्या हस्ते दीप प्रज्वलित करून मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड, उद्योजक बाळू तवळे, अरुण गुरव, वासुदेव बैलमारे आदी उपस्थित होते.

गेल्या वर्षभरात मृत झालेल्या दोन वर्ग मित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विजय मांडे यांनी, 'मला माझ्या पत्रकारितेच्या कारकिर्दीत अनेक मित्रांचे योगदान आहे. आपण निवृत्त होई पर्यंत कुटुंबासाठी, समाजासाठी काम केले आता स्वतः साठी वेळ द्या आणि आपले जीवन निरोगी ठेवा.' असा सल्ला दिला. पहिल्यांदाच मेळाव्याला उपस्थित राहिलेल्या माजी विद्यार्थ्यानी आपली जीवन कहाणी सादर केली. शाळेतील स्नेहसंम्मेलनापासून ते परीक्षेत कॉपी कशी केली याची रंजक कहाणी सांगून जुन्या आठवणींना उजाळा दिला. दिगंबर कांबळे, तानाजी बैलमारे, गजानन काळे, हेमंत डोंबे, मदन ओसवाल, विनय भागवत, जितेंद्र कोठारी, बाळू तवळे आदींनी आपली जीवन कहाणी कथन केली.

# शिवदास कांबळे यांना रायगड जिल्हा परिषदेचा रायगड भूषण २०२२ पुरस्काराने आले गौरविण्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळातील एक लोकप्रिय व्यक्तिमत्व माजी नगर–सेवक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकारी जिल्हाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरे यांचे कट्टर समर्थक म्हणून पनवेलकरांच्या परिचयाचे असलेल्या व बुद्धिजीवी राजकारणी म्हणून ओळख असलेले डॉ. शिवदास विठ्ठल कांबळे यांना रायगड जिल्हा परिषदेने २०२२ रायगड भूषण पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.



डॉ.शिवदास विठ्ठल कांबळे यांना रायगड जिल्हा परिषदेच्यावतीने अलिबाग येथे रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा कुमारी योगिता पारधी व महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड कुमारी आदिती सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. शिवदास विठ्ठल कांबळे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाच्या सर्वोच्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करून त्यांच्या सामाजिक व वंचित घटकांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आलेला आहे. पनवेल मधील अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्थांची त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असून त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

## नावात बदल

मी खाली सही करणार **अंजु अंबादत्त शर्मा,** रा.अनमोल प्लॅनेट, ३०६, प्लॉट नं.२११, कोपरा रोड, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मागे, सेक्टर १०, कोपरा, खारघर, रायगड, महाराष्ट्र–४१०२१०.

मी माझे नाव ॲफेडिव्हीट नं.२६/६४७/२२ अन्वये बदलले असून यापुढे मी **अंजु अंबादत्त शर्मा** या नावाने ओळखली जाणार आहे. तसेच **अंजली विक्रम यादव, अंजू विक्रम यादव व अंजू अंबादत्त शर्मा** या तिन्ही नावाची व्यक्ती एकच असून यापुढे मी **अंजु अंबादत्त शर्मा (नवीन नाव)** या नावाने ओळखली जाईल.

**सही/–**
**अंजु अंबादत्त शर्मा**

---

ॲड.प्रज्वल ध्रुव गायकवाड

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील फौजदारी न्याय.प्र.वर्ग यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.३५७/२०२१
नि.नं.१०/ड
ने.ता.२५/०४/२०२२

श्रीम.सरोजा मधुकर भूमी — अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत वावेघर — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्रीम.सरोजा मधुकर भूमी यांची मुलगी कु.मनुषा मधुकर भूमी हिचा जन्म दि.२/१/२०१४ रोजी झालेला आहे. परंतु माझ्या मुलीच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत वावेघर–पनवेल येथे करण्याची राहून गेलेली आहे. त्याकरिता मी पनवेल कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरील जन्माच्या दाखल्यासंदर्भात कोणाची हरकत असल्यास येत्या ३० दिवसांत कोर्टात कळवावी. सदरील हरकत वेळेत आली नाही तर जन्माचा दाखला देण्यात येईल. तसेच नंतर येणाऱ्या हरकतींची नोंद घेण्यात येणार नाही.

दि.४/०३/२०२२ रोजी पेपर नोटीस प्रसिद्ध करण्यास दिली.

**सही/–** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत माझे अशिलाने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक श्री.दत्तात्रेय लक्ष्मण पोपेटा या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटी प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पालीदेवद (सुकापूर), तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | मिळकत क्र. | क्षेत्र | मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|
| पालीदेवद | ६६ | २०१६ चौ.फुट | मोकळी जागा |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.०४/०३/२०२२

**सही/–**
**ॲड.श्री.महेंद्र अनंता पाटील**
**डी/३/१, किनारा सोसा.,**
**बावन बंगलो, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८९८०४४६७८**

---

गोडसे साहेब कोर्ट

ॲड.सुजाता पाटील ८८७९४१६४८३

## जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२२५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०८/०४/२०२२

१) श्रीमती.ज्योती पुरुषोत्तम पत्ती
२) कुमारी.प्रज्ञा पुरुषोत्तम पत्ती
३) श्री.मोहित पुरुषोत्तम पत्ती
सर्व रा.सदनिका नं.ए २०२, साई सदन सी.एच.एस,
प्लॉट नं.५६, सत्याग्रह कॉलेज जवळ, सेक्टर १९
खारघर, नवी मुंबई, तालुका : पनवेल
जिल्हा : रायगड महाराष्ट्र ४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अ.नं.२ व अ.नं.३ यांचे वडील श्री.पुरुषोत्तम मैसन्ना पत्ती हे दि.०२/०१/२०१६ रोजी खारघर, नवी मुंबई, तालुका : पनवेल येथे मयत झाले. मयत कै.श्री.पुरुषोत्तम मैसन्ना पत्ती यांचे नांवे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्ता परिशिष्ट**
**सदनिका नं.ए १०२, साई सदन सी एच एस,**
**प्लॉट नं.५६, सत्याग्रह कॉलेज जवळ, सेक्टर १९**
**खारघर, नवी मुंबई, तालुका : पनवेल**
**जिल्हा : रायगड महाराष्ट्र–४१०२१०**
**एकूण क्षेत्रफळ : ५४७ चौ.फुट**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.४/०३/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.सागर एस. जगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२५९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

श्री.सुधाकर शांताराम जगे, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका आहे. सदर निवासी सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील पनवेल महानगरपालिका हद्दीतील निवासी सदनिका नं.३०३, प्लॉट नं.१५३, यशकमल मिडल क्लास, को.ऑ.हौ.सो., ता.पनवेल, जि.रायगड

कै.कमलाबाई शांताराम जगे हे दि.०७/०९/२०११ रोजी पनवेल येथे मयत पावल्या असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्री.सुधाकर शांताराम जगे, रा.यशकमल, एम.सी.एच.सो., प्लॉट नं.१५३, फ्लॅट नं.३०३, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार क्र.२) श्री.रमेश शांताराम जगे, रा.यशकमल, एम.सी. एच.सो. प्लॉट नं.१५३, फ्लॅट नं.४०२, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार क्र.३) कै.विजय शांताराम जगे (मयत) तर्फे वारस ३/१) श्रीमती.वैशाली विजय जगे, ३/२) श्री.विनीत विजय जगे, ३/३) श्री.संकेत विजय जगे, सर्व रा.यशकमल, एम.सी.एच.सो. प्लॉट नं.१५३, फ्लॅट नं.४०१, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार क्र.४) कै.राजन शांताराम जगे (मयत तर्फे) वारस ४/१) श्रीमती.रतीका राजन जगे, रा.यशकमल, एम.सी.एच.सो. प्लॉट नं.१५३, सदनिका नं.३०२, ता.पनवेल, जि.रायगड. ४/२) सौ.मिरा मयुरेश शेट्ये, रा.फ्लॅट नं.सी–३, ६०३, हायड्रा पार्क, कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.८, ९, १०, सेक्टर ३५ जी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४/३) सौ.श्रेया सुरज ठकेकर, रा.रुम नं.२०४, गजराज सोसायटी, कोप्रो कॉलनी, नियर बारा बनगळोव, कोप्रोली, पोलीस लाईन, ठाणे, अर्जदार क्र.५) श्रीमती.वैशाली विजय पांडव, रा.यशकमल एम.सी.सी.एच.सो. प्लॉट नं.१५३, फ्लॅट नं.३०४, ता.पनवेल, जि.रायगड. सबब अर्जदार हेच कै.कमलाबाई शांताराम जगे यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.कमलाबाई शांताराम जगे यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालय योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.४/३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

आरटीएस वि.मा.अर्ज क्र.६६/२०२१

प्रति,
१) अनिल यशवंत वैद्य
२) विनायक पुरुषोत्तम देवधर
३) मंगल नारायण साठे
४) सुनील वसंत टिळु
५) आरती रमेश कानडे
अ.क्र.१ ते ५ यांचे कुळअखत्यारी म्हणून
श्री.समीर काशिनाथ कडुसकर
रा.धाकटे वेणगाव, ता.कर्जत, जि.रायगड — अपिलार्थी
विरुद्ध
१) नितीन गोविंद वैद्य
२) नरेंद्र गोविंद वैद्य
३) इंदुमती गोविंद वैद्य
अ.क्र.१ ते ३ रा.मोठे वेणगाव, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

वादी यांनी मौजे : धाकटे वेणगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ९५० चे विरुद्ध दि.११/१०/२०२१ रोजी या कार्यालयात अपील दाखल केले आहे. प्रस्तुतचा अपील दाखल करणेस अर्जदार यांना विलंब झाला असल्याने अर्जदार यांनी विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज सोबत दाखल केला आहे.

सदर विलंब माफीचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.२६/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.२९/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १ | जुना सर्व्हे नं.६४/६<br>नवीन सर्व्हे नं.२३/६ | ०–१५–२० | २.१२ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : ०३/०३/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत**

---

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आ. प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

पालन करतात किंवा कसे यांची शहानिशा केली जाते. मंडळाकडून तळोजा औद्यगिक क्षेत्रामध्ये रात्रीची पहाणी करण्यात येते व दोषी कारखान्यावर नियमीत कारवाई करण्यात येत असून तळोजा परिसरातील दुर्गधीच्या तक्रारीच्या अनुषंगाने एकूण १३ उद्योगांवर कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये मागील ०१ वर्षामध्ये ०६ उद्योग बंदचे आदेश, ०१ प्रस्तावित निर्देश, ०६ कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

## अधिवेशनात नैनाचा प्रश्न मांडणार : आ.जयंत पाटील

आणू असे सांगण्यात आले. यावेळी नामदेव शेठ फडके, वामन शेळके, बाळाराम फडके, राजेश केणी, सुभाष भोपी, बबन फडके, विलास फडके, शेखर शेळके, डि के भोपी, राज पाटील, गजानन पाटील, अनिल ढवळे, मोहन भोपी, रामचंद्र फुलोरे आदींसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन नरेंद्र भोपी यांनी केले.

## विना वेतन कर्मचाऱ्यांचा प्रश्न ४८ तासात सोडविला

आणि त्याच अनुषंगाने ४८ तासाच्या आत उदय सामंत यांनी स्वतःच्या दालनात बैठक घेऊन सकारात्मक चर्चा करून संस्थाचालकाला कडक शब्दात आदेश देऊन कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला आणि उदय सामंत यांच्या हस्ते पाणी ग्रहण करून कर्मच्यारांनी उपोषण सोडले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष आमदार राजेश पवार, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के, शिक्षक सेनेचे अजित चव्हाण, जगदिश भगत, नाईक, मंगेश पाटील, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, संदिप तांडेल, गणेश परब, किरण सोनावणे, राजेश वैगणकर, प्रसाद शिरोडकर, सिद्धेश गुरव, सुगंधा शिंदे, सेजल खडकबन तसेच एम.एस.बी.टी. चे अधिकारी वाघ उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेल परिसरात अनैतिक व्यवसाय करणाऱ्या ५ जणांविरुद्ध कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात उघड्यावर अश्लिल हावभाव व लज्जास्पद असे कृत्य करणाऱ्या ५ जणींविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील एस.टी. स्टॅण्ड परिसर तसेच भाजी मार्केट परिसरात काही महिला या भर रस्त्यातच अश्लिल हावभाव व गिऱ्हाईकांना खुणावणे व लज्जास्पद असे कृत्य करणे त्यामुळे सर्वसामान्य महिलांना येथून ये-जा करण्यास जिकरीचे बनले होते. याबाबतची तक्रार महिला मंडळाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सहा. पो.नि.वृषाली पवार व त्यांच्या पथकाने अचानकपणे धाड टाकून ५ जणींना ताब्यात घेवून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली आहे व यापुढे सुद्धा अशा प्रकारे कृत्य करणाऱ्या महिलांविरोधात कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांनी दिली आहे.

## विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील गव्हाण फाटा पाण्याच्या टाकीजवळ साई मंदिर जवळील झोपडपट्टी राहणारी एक विवाहिता महिला राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सौ.आसु महादेव मुंडा (२७) रंग गोरा, उंची साधारण ५ फुट, डोक्याचे केस काळे व कमी लांब, डोळे काळे, नाक सरळ, अंगाने सडपातळ असून अंगात पिवळ्या रंगाची साडी, गळ्यात काळ्या मण्यांचे मंगळसूत्र, कानात झुमके, हातात धातूच्या चार बांगड्या आहेत. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.ना.मिलींद झिने यांच्याशी संपर्क साधावा.

## १ लाख ४८ हजार ९९९ रुपयाची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१ लाख ४८ हजार ९९९ रुपयाची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

शहरात राहणारे सौरभ मोरे यांना एका अज्ञात इसमाने मोबाईलवर फोन करून इंडियन आर्मी मधून श्रीकांत यादव बोलत असून विणा राऊत यांच्याकडून डायट प्लॅन घेतला आहे व त्यासाठी पेमेंट करायचे आहे. इंडियन आर्मीचे अकाऊंट वेगळ्या प्रकारचे असते. त्यासाठी आपल्याला अगोदर पेमेंट करावे लागते, असे खोटे सांगून व पैसे पाठविले नाही तर इंडियन आर्मीकडून कारवाई करू असे सांगून बोलण्यात गुंतवून त्यांच्या बँक ऑफ महाराष्ट्र अकाऊंटमधून एकूण ९९ हजार ९९९ रुपये फोन पे द्वारे अनोळखी खात्यावर ट्रान्सफर करून घेतले. तसेच त्यांच्या एचडीएफस बँकेच्या डेबीट कार्डचे डिटेल विचारुन त्यांच्या मोबाईलवरुन आलेला ओटीपी त्यांच्याकडून घेवून त्यांच्या एचडीएफसी बँक अकाऊंटमधून ४९ हजार रुपये अनोळखी व्यक्तीच्या खात्यावर ट्रान्सफर करून त्यांची एकूण १ लाख ४८ हजार ९९९ रुपयाची ऑनलाईन फसवणूक केल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# अखेर मुख्याधिकाऱ्यांनी दिला मुकुंद नगरवासियांना 'हक्कांचा रस्ता'

## मुख्याधिकारी यांनी लिंबूपाणी देवून ३६ तासानंतर सोडविले मुकुंदनगरवासियांचे उपोषण

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मागील २० वर्षांपासून प्रलंबित असलेला अधिकृत रस्त्यांचा प्रश्न अखेर खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी मार्गी लावला आहे. गुरूवारी (दि.३ मार्च) रात्री १० वाजेच्या सुमारास उपोषणस्थळाला भेट देत उद्या (शुक्रवार) पासून शेजारील गणेशनगरातून तात्पुरता तर सहा महिन्यांत भानवज मार्गे कायमस्वरूपी रस्ता देण्याचे लेखी आश्वासन दिले, त्यानंतर मुकुंद नगरवासी यांनी आपल्या दोन्ही मागण्या मान्य झाल्याने मुख्याधिकारी अनुप दुरे यांचे आभार मानत, त्यांच्या हस्ते लिंबूपाणी घेवून उपोषण सोडले.



गेल्या २० वर्षापासून सर्वे नंबर ८ व हिस्सा नंबर २ सिटीएस नं.५३४८ मधून राहत्या जागेत येण्या-जाण्यासाठी अधिकृत रस्ता नाही. अधिकृत रस्ता मिळण्यासाठी मुकुंद नगर वासियांनी खोपोली परिषदेकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. पण वारंवार अर्ज व निवेदन देवूनही हक्काचा रस्ता मिळत नसल्याने शेवटी दि. २ मार्च २०२२ रोजी खोपोली नगर परिषदेसमोर उपोषण सुरू केले होते. दरम्यान, दि. ३ मार्च २०२२ रोजी रात्री १० नंतर मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी उप मुख्याधिकारी भगळे यांच्यासह उपोषणस्थळाला भेट दिली. यावेळी उद्या (शुक्रवार) पासून शेजारील गणेशनगरातून तात्पुरता तर सहा महिन्यांत भानवज गावातून कायमस्वरूपी रस्ता देण्याचे लेखी आश्वासन त्यांनी उपोषणकर्त्यांना दिले. मुकुंद नगरवासी यांच्या दोन्ही मागण्या मान्य झाल्याने मुख्याधिकारी अनुप दुरे यांचे आभार मानत, त्यांच्या हस्ते लिंबूपाणी घेवून मुकुंद नगर वासियांनी उपोषण सोडले. मुख्याधिकारी यांनी शब्द दिल्याप्रमाणे शुक्रवारी सकाळपासून जेसीबी लावून तात्पुरता रस्ता दुरूस्त करण्यास सुरूवात करण्यात आली आहे.

## कोलाड केंद्रावर बारावी परिक्षा चोख बंदोबस्तात सुरू

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

आज दि.४ मार्च रोजी सुएसोचे द.ग.तटकरे माध्य.विद्या. कोलाड व ज्युनिअर कॉलेज कोलाड येथे बारावी परीक्षा चोख पोलिस बंदोबस्तात व सुरळितपणे सुरू करण्यात आली आहे.

येथील केंद्र प्रमुख संचालक डी. आर.पाटील, उपकेंद्र संचालक जी. डी. घोणे, प्राचार्य एस. ए. येरूणकर, स्कूल कमिटी संचालक मंडळ सदस्य सुरेशदादा महाबले यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली संपन्न होत असलेल्या व कोलाड पोलीस उपनिरिक्षक सुभाष जाधव यांच्या नेतृत्वाखाली याकूब तडवी - गोपनीय कक्ष यांच्यासह बंदोबस्तासाठी मोठा पोलीसफाटा सुरक्षिततेसाठी तैनात ठेवला असून शासकीय कोरोना नियमावलीचे पालनही व्यवस्थितरीत्या केले जात असल्याचे संचालकांकडून माहिती देताना सांगितले. या केंद्रात परीक्षेसाठी एकूण ५९६ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले आहेत. तर अतिशय मोकळ्या वातावरणात व कोविड काळातील शासकीय नियमानुसार आमच्या कोलाड केंद्रावर परीक्षा सुरळितपणे सुरू झाली असून विद्यार्थी वर्गाने मोकळेपणाने आपापले पेपर सोडवून बारावी परीक्षेत चांगले गुण संपादन करा. अशाप्रकारच्या सदिच्छा येथील संचालक मंडळाचे सदस्य व आंबेवाडी सरपंच सुरेशदादा महाबळे यांनी विद्यार्थी वर्गाला परीक्षेसाठी शुभेच्छा देताना व्यक्त केल्या.

## १२ वी बोर्ड परिक्षेसाठी तळा केंद्रावर २४९ विद्यार्थी प्रविष्ठ

**दै.रायगड नगरी । तळा**

उच्च माध्यमिक शालांतप्रमाणपत्र परीक्षा २०२२ कला-वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, तळा केंद्र क्रमांक २७४१ या केंद्रावर एकूण २४९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. त्यामध्ये कला शाखा नियमित ४९, खाजगी ३, पुनर्परिक्षार्थी ६ असे एकूण ५८ विद्यार्थी प्रविष्ठ,वाणिज्य शाखेसाठी नियमित १२४, खाजगी १, पुनर्परिक्षार्थी २, असे एकूण १२७ विद्यार्थी प्रविष्ठ तर विज्ञान शाखेसाठी नियमित ६१, खाजगी २, पुनर्परिक्षार्थी १ असे एकूण ६४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत.

सदर केंद्रावर केंद्रसंचालक म्हणून प्राध्यापक वाले आर. बी., उपकेंद्र संचालक बोळेगावे आय. बी., स्टेशनरी पर्यवेक्षक किरण नागावकर, क्लार्क स्वप्निल वरंडे, तर शिपाई म्हणून प्रसाद सुतार, कविता सुतार व प्रकाश जाधव काम पहात आहेत. कोरोनानंतर ऑफलाईन पद्धतीने होणारी ही पहिलीच परीक्षा असल्याने बोर्डाने यावर्षी ७० व ८० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी ३० मिनिट तर ४० व ६० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी १५ मिनिट जास्तीचा वेळ दिला आहे.



केंद्रावरील सर्व विद्यार्थ्यांचे तापमान तपासून व सॅनिटायझर करून परीक्षा दालनांत प्रवेश देण्यात आला.

कोविड १९ च्या सर्व नियमांचे पालन करून विद्यार्थ्यांना झिगझॅग पद्धतीने परीक्षा दालनात बसविण्यात आले आहे. ही परीक्षा व्यवस्थित व सुखरुप पार पडावी यासाठी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, सचिव मंगेश देशमुख, तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ अस्मिता भोरावकर, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन श्रीराम कजबजे, गो. वेदक विद्यालयाचे चेअरमन महेंद्रशेठ कजबजे, संस्थेचे सदस्य चंद्रकांत खातू, प्राचार्य बाळासाहेब धुमाळ आदी मान्यवरांनी तळा केंद्रावरील सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## शिवसत्ता टाइम्स हे निपक्षपणे काम करणारे नेतृत्व ठरेल : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलसह रायगड, नवी मुंबई आणि महाराष्ट्राचे खंबीर नेतृत्व करण्यासाठी एक आगळा वेगळा विचार समोर आणून शिवसत्ता टाइम्स या वेब पोर्टल आणि यू ट्यूब चॅनलचा शुभारंभ मंगळवार दिनांक ०१ मार्च २०२२ रोजी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर शहरातील नवीन पनवेल येथील पृथ्वी सभागृहामध्ये दिमाखदार सोहळा पार पडला. यावेळी माहिती व जनसंपर्क संचालनालयाचे उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार होती, मात्र शासकीय कामांचा वाढता ताण लक्षात घेता त्यांनी आपल्या डिजिटल शुभेच्छा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे देवून कार्यक्रमात हजेरी लावली. यांकऱ्यक्रमाचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



यावेळी शिवसता टाइम्सचे संपादक राज भंडारी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. या शुभारंभ सोहळ्याला पन-वेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम दादा म्हात्रे यांच्यासह भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाच्या केंद्रीय सल्लागार समितीचे सदस्य अभिजित पां. पाटील, शिवसे-नेचे जिल्हा सल्लागार बबनदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, श्रीरामपूर नगरपरिषदेचे राष्ट्रवादीचे नगरसेवक तथा राधाकृष्ण विखे पाटील यांचे खंदे समर्थक सोमनाथ गांगड, भाजपचे अल्पसंख्यांक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अकबर सय्यद, शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, उत्तर भारतीय सेलचे अध्यक्ष सी.पी.प्रजापती आदींसह मान्यवर उपस्थित राहिले. या शुभारंभ सोहळ्याचे निवेदन शिवसेनेचे नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन देशमुख यांनी केले तर शिवसता टाइम्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे व्यवस्थापक योगेश तांडेल आणि दीपांजली तांडेल यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. या कार्यक्रमाला अनेक दिग्गज नेत्यांसह मित्र परिवाराने आपली हजेरी दर्शविली.

## माथेरान एमटीडीसीमध्ये ५०% सूट

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने माथेरान एमटीडीसी रिसॉर्ट च्या माध्यमातून पर्यटकांसाठी खास पर्वणी जाहीर केली असून ६ मार्च ते १० मार्च ह्या दरम्यान येणाऱ्या पर्यटकांना ५०% सवलत दिली जाणार आहे.

सध्या परीक्षा हंगाम सुरू असल्यामुळे माथेरानमधील पर्यटन थंड आहे तरीही काहि पर्यटक येथे येतच असतात त्यामुळेच माथेरान येथील महाराष्ट्र पर्यटक निवास येथील रिसॉर्ट मध्ये दि ६मार्च ते १० मार्च ह्या कालावधी पर्यटकांसाठी खास सवलत जाहीर केली असून ह्या काळात एमटीडीसी माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना ५०% सवलत देण्यात येणार आहे त्यामुळे पर्यटकांनी ह्याचा लाभ घेण्यासाठी माथेरानचे निवासी व्यवस्थापक श्री अमोल भारती यांच्याशी संपर्क साधून ह्या योजनेचा लाभ घेऊ शकतात ह्या योजनेला सध्यातरी चांगला प्रतिसाद लाभत असून आगाऊ बुकिंग वरून दिसून येत आहे , सध्याच्या मंदीच्या काळात पर्यटकांची संख्या वाढल्यास त्याचा फायदा माथेरानच्या व्यावसायिकांना मिळणार आहे.


गोडसे साो कोर्ट

ॲड.रेखा होवाळे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर पनवेल

अर्ज क्र.२३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३१/०३/२०२२

१) श्रीमती.कल्पना बथुला नरसिम्हा राव
वय : ५१, व्यवसाय : काही नाही
२) रतीन बथुला नरसिम्हा राव
वय : २१, व्यवसाय : विद्यार्थी
३) तिस्या बथुला राव
वय : १४ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
रा.हुमायु महल, बीएसएनएल, ऑफिस कॉलनी,
आग्रीपाडा, भायखळा, मुंबई — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.लक्ष्मा बथुला सर्वेश्वर राव
रा.१०-१/३४७, आनंद नगर कॉलनी,
खैरताबाद, हैदराबाद — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत श्री.बथुला नरसिम्हा सर्वेश्वर राव हे दि.१७/०७/२०२१ रोजी मुंबई येथे निधन पावले आणि अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ व ३ ही मुले आहेत. व सामनेवाला ह्या मयत श्री.बथुला नरसिम्हा सर्वेश्वर राव ह्यांची आई आहे. यांनी त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

Name of the Property Holder : Late Shri Bathula Narsimha Sarveshwar Rao.

Flat No.303, admeasuring 658 sq.ft. (i.e.61.15 Sq. meters.), building known as "Arihant Shree", Plot No.6 & 7, at village-SHEEL KHOPOLI, Taluka-Khalapur, Dist-Raigad, Agreement Value Rs.13,80,000/- (Rupees Thirteen Lakhs Eighty Thousand Only).

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवाव्या. आणि या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ४ माहे ३ सन २०२२ बेलिफाकडे

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मे.मुजावर सो यांचे कोर्ट

ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२७६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०४/२०२२

कै.भारत मारुती पवार मयतचे वारस
श्रीमती.इंदु मारुती पवार
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.४३, धरमा बारक्या चाळ, पाईप लाईन वरती,
जी.डी.रस्ता, गायत्री विद्या मंदिर जवळ, आंबेची भरणी,
तुळशीपाडा, भांडुप वेस्ट, मुंबई ४०००७८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार हे कै.भारत मारुती पवार यांची आई आहे. कै.भारत मारुती पवार यांची आई असून कै.भारत मारुती पवार यांचे दिनांक ३०/०५/२०१९ रोजी मु.फुंडे, द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले असून श्रीमती. इंदू मारुती पवार ह्यांनी कै.भारत माारुती पवार यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, रोझ विला सहकारी गृहनिर्माण संस्था, प्लॉट नं.७०, सेक्टर नं.१५, द्रोणागिरी, उरण, क्षेत्र-कार्पेट एरिया २१.३३८ चौ.मी., एनक्लोज बाल्कनी एरिया ३.००० चौ.मी., प्रोजेक्टेड एरक्लोज बाल्कनी ६.४८० चौ.मी., सी.बी.एरिया १.४६३ चौ.मी., एफ बी एरिया २.८२० चौ.मी., ता.उरण, जि.रायगड**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रु.१८,८०,०००/-**
**(अक्षरी रक्कम रुपये अठरा लाख ऐंशी हजार मात्र)**

वरील मिळकत ही कै.भारत मारुती पवार यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.इंदू मारुती पवार, हे कै.भारत मारुती पवार यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतलया नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.इंदु मारुती पवार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.भारत मारुती पवार यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०३/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

राव साहेब

अर्जदारांतर्फे वकील
ॲड.नागेश अरविंद हिरवे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.) स्तर पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२५५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

कै.पीटवास रघुनाथ गौडा आणि
कै.प्रथवी पीटवास गौडा (मयत) तर्फे वारस
श्री.सीबा शंकर रघुनाथ गौडा
वय : ३९ वर्षे, धंदा :
रा.फ्लॅट नं.४, तळमजला,
आकाश को.ऑप.हौ.सोसायटी,
सुकापूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.पीटवास रघुनाथ गौडा यांचे निधन दि.०६/१२/२००२ रोजी विश्राळी तलावासमोर, मुंबई पुणे महामार्ग, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाले आणि कै.प्रथवी पीटवास गौडा यांचा मृत्यू दि.०८/०९/२००४ रोजी ख्रिस्तियन हॉस्पिटल, बेरहामपूर, ओडीसा येथे झाला. कै.पीटवास रघुनाथ गौडा आणि कै.प्रथवी पीटवास गौडा यांचे मृत्यूसमयी त्यांचे ताबे कब्जा व वहिवाटीतील सामाईक मालकीची म्हणजेच (५०-५०% हिस्सा) असलेली स्वकष्टार्जित मालकीची मिळकत होती. सदर निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**निवासी सदनिका मिळकतींचे वर्णन**
**१) फ्लॅट नं.डी-०४, तळमजला, बिल्डींग नं.ए-६/३, आकाश को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., पालीदेवद/सुकापूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड (क्षेत्र ५०७ चौरस फुट बिल्टअप एरिया)**

कै.पीटवास रघुनाथ गौडा आणि कै.प्रथवी पीटवास गौडा यांचे मृत्यू पश्चात त्यास अर्जदार हेच कायदेशीर वारस आहे. सबब सदरचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदारांनी सदर अर्ज या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या मे.न्यायालयात सादर कराव्यात.

जर सदरहू मुदतीत कोणीही योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू मे.न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत कै.पीटवास रघुनाथ गौडा आणि कै.प्रथवी पीटवास गौडा यांचे वारस घोषित करून अर्जदारांना वारस दाखला देण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दि.४/०३/२०२२ रोजी न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.श्री.सोनावणे साो

ॲड.अमर बनसोडे / ॲड.अनिल एस. जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२५४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०४/२०२२

१) श्रीमती.पल्लवी गुरुनाथ मांजरेकर
वय : ७७ वर्षे, धंदा : काही नाही
२) सौ.सुजाता सिवरामकुमार परिटी
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.फ्लॅट नं.२०३, प्लॉट नं.२६३,
श्री विनायक धाम सी एच एस, सेक्टर-१०,
न्यू पनवेल पूर्व सिडको गार्डन जवळ,
पनवेल, रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

१) अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील कै.गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर हे दि.२६/०३/२०१० रोजी सदनिका क्र.२०३, श्रीगणेश विनायक सी.एच.एस. प्लॉट नं.२६३, सेक्टर-१०, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत तसेच अर्जदारांशिवाय कै.गुरुनाथ ठ्ठिल मांजरेकर यांना कोणीही वारसदार नाहीत.

२) अर्जदार यांचे म्हणणे असे की, अर्जदार कै.गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर यांचे वारस आहेत. अर्जदार क्रं.१ चे पती व अर्जदार क्रं.२ यांचे वडील मयत कै.गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर यांची नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची नावे असलेली तसेच प्रत्यक्ष ताबे-कब्जातील मिळकत आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| सदनिका क्रं. | क्षेत्र | इमारतीचे नाव | सेक्टर प्लॉट |
|---|---|---|---|
| २०३ | ४५६ चौ.फुट कारपेट | श्री गणेश विनायक धाम | सेक्टर-१० प्लॉट नं.२६३ |

कै.गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.३ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै. गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर यांचे वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेलया मिळकती ह्या कै.गुरुनाथ विठ्ठल मांजरेकर यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ४/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# माथेरानच्या जंगलात आगीचे तांडव

## प्रशासक सुरेखा भणगे- शिंदेंच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये मागील अतिवृष्टीमुळे असंख्य झाडे जंगलात उन्मळून पडली आ–हेत.जंगलात सगळीकडे पालापाचोळा आणि सुकलेल्या झाडांचा खच पडलेला असल्याने दि. ३ गुरुवारी रात्रीच्या अंधारात येथील काळोखी गारबट मार्गावरील सुकलेली काही झाडे रात्रीच्या अंधारात साधारण नऊ वाजण्याच्या सुमारास आगीच्या भक्ष्यस्थानी असल्याचे ललित पांगसे, शाबी रीझारीयो या जागरूक नागरिकांच्या निदर्शनास आले त्यावरून त्या नागरिकांनी ताबडतोब फायर ब्रिगेडचे चालक अजिंक्य सुतार यांना फोन करून कळविले जलदगतीने सूत्रे हलल्यानंतर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दहा मिनिटात माथेरानच्या कार्यकुशल मुख्याधिकारी उत्तम प्रशासक सुरेखा भणगे–शिदे ह्या क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी दाखल झाल्या फायरब्रिगेड गाडी चालक अजिंक्य सुतार, सुजय भोसले आशिष परब, सुरेश शिंदे, योगेश देशमुख हे घटनास्थळी दाखल झाले आणि झाडाला लागलेली आग तात्काळ विझविण्यात आल्याने मोठी नैसर्गिक जगलं हानी टळली आहे.

मोठ्या प्रमाणात झाड पेटत असताना वाऱ्याच्या प्रचंड वेगामुळे सर्वत्र ठिणग्या पसरत होत्या, जमिनीवर सुका पाला पडलेलानेही पेट घेतला होता जर आग मध्यरात्री उशिरा लागली असती तर हवेमुळे त्या भागातील संपुर्ण जंगलच आगीच्या भक्ष्यस्थानी गेले असते परन्तु रात्री दहा वाजता कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे शिंदेंना माहिती मिळताच त्यांनी आपल्या टीमसह घटनास्थळी धाव घेवून वेळीच आग आटोक्यात आणली. दरम्यान ही आग अचानक लागली की अन्य कुणी लावली असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

तर इथल्या जंगलात ज्या ज्या ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत ती वनखात्याच्या संबंधित अधिकारी वर्गाने योग्य ठिकाणी आपल्या कार्यालयाच्या मोकळ्या आवारात ठेवल्यास असे प्रकार घडणार नाहीत. या पाच वर्षात वनखात्याच्या अखत्यारीत असलेल्या वन संरक्षक समितीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत. परंतु या समितीच्या संबंधीत कामगारांना विकास कामे करताना इथली वनराईचे कशाप्रकारे जतन करता येऊ शकते माथेरानची खरी ओळख ही याच गर्द वनराई मुळे अबाधित आहे पर्यटन व्यवसाय केवळ या झाडीमुळे वाढत आहे याचा कदाचित या समितीला विसर पडल्यामुळे जंगलाची आगीमुळे हानी होत आहे. याकामी वनखात्याच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने सदरची बाब गांभीर्याने घेऊन माथेरानच्या वनांचे जतन करावे अशी मागणी स्थानिकांमधून केली जात आहे.

# पेण नगरपालिकेचे 'माझी वसुंधरा' अभियान ; भोगावती नदी स्वछता मोहीम

**दै.रायगड नगरी । पेण**

स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा या अभियानांतर्गत पेण नगरपालिकेच्या माध्यमातून स्वच्छ शहर करण्याचा अधिक निर्धार पेण नगरपरिषदेने केला असून या अनुषंगाने शहरातील विश्वेश्वर नदिपात्रा जवळ असणा–या मंदिरा जवळील संपूर्ण परिसर यावेळी स्वच्छ करण्यात आला.

पेण नगरपालिका तर्फे स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत जलसंवर्धन मोहीम नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी जिवन पाटील यांच्या आदेशाने नदीपात्रात वाढलेली जलपर्णी, गवत याबरोबरच गाळ साफ करण्यात आला. नगरपालिकेने शहरात सौर दिवे, चार्जिंग स्टेशन्स, वृक्ष लागवड, सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा व्यवस्थापन असे उपक्रम राबवले आहेत.

पहील्या टप्प्यात जल सर्वधनाच्या संकल्पनेतुन भोगावती नदी काठी स्वच्छता करण्यात आली होती. शहरात स्वच्छ अभियान अधिक गतिमान करण्याच्या उद्देशाने हे काम सुरू आहे. त्यामुळे या अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगरपालिकेचे स्वच्छता व आरोग्य अधिकारी शिवाजी चव्हाण यांनी केले आहे. यावेळी प्रशासन स्वच्छता विभाग अभियंता अंकिता नरुटे, अधिकारी राजाराम नरुटे, अधिकारी किरण शहा, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण आदि उपस्थित होते.

पेण नगरपालिकेने सुरु केलेल्या माझी वसुंधरा योजने अंतर्गत भोगावती नदी स्वछता अभियानाची पाहणी आमदार रवींद्र पाटील यांनी आज भेट देऊन पाहणी केली व नगरपालिकेच्या कार्याचे कौतुक केले.



# पंचायत समितीच्या उपसभापती पदी शिवसेनेचे हिराजी घरत



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण पंचायत समितीच्या उपसभापती पदासाठी आज झालेल्या निवडणुकीत शिवसेनेचे सदस्य हिराजी घरत यांची आज उपसभापती पदी एकमताने निवड करण्यात आली. यावेळी शिवसैनिकांनी व महाविकासआघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली.

उरण पंचायत समितीमध्ये महाविकास आघाडीची निर्विवाद सत्ता आहे. शेकापच्या उपसभापती शुभांगी पाटील यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसभापती पदासाठी आज निवडणूक घेण्यात आली. त्यासाठी महाविकास आघाडीने शिवसेनेचे पंचायत समिती सदस्य हिराजी घरत यांना संधी दिली. काल झालेल्या निवडणुकीसाठी हिराजी घरत यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी हिराजी घरत यांची उपसभापती पदी निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी शिवसैनिकांनी व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला. यावेळी नवनिर्वाचित उपसभापती हिराजी घरत यांचे जिल्हाउपप्रमुख नरेश रहाळकर, जि प सदस्य विजय भोईर, सभापती समिधा म्हात्रे, मावळत्या उपसभापती शुभांगी पाटील, नरेश घरत, सुरेश पाटील, वैशाली पाटील, यांनी अभिनंदन केले आहे.

# काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसची वरिष्ठ पातळीवर बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

येत्या काळात येऊ घातलेल्या निवडणूकी संदर्भात तसेच विविध समित्यांवर होणाऱ्या नेमणुका, जिल्हा नियोजन समिती मार्फत होणारी कामे, विशेष अधिकारी विविध निवडणुकांमध्ये देण्यात येणारी उमेदवारी आदि विषयांवर आज झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी येणाऱ्या काळात काँग्रेस पक्षाला प्रत्येक निवडणुकीत तसेच विविध समित्यांवर नेमणूक व विविध विकास कामे यांमध्ये सन्मानपूर्वक सहभाग देऊन काँग्रेस पक्षाच्या खांद्याला खांदा लावून काम करू असे आश्वासित करण्यात आले.

या बैठकीवेळी खासदार सुनील तटकरे, रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत, म.प्र.काँ.क. चिटणीस प्रविण ठाकूर, महिला काँग्रेस अध्यक्षा सौ. श्रद्धा ठाकूर, रा. जि. काँ. उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर आदि उपस्थित होते.


# जेएनपीटी रस्त्यावर चिर्ले गावाजवळ कंटेनर ट्रेलर घसरला

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जेएनपीटी – पनवेल रस्त्यावर चिर्ले गावाजवळ एक ४० फूट लांबीचा कंटेनर ट्रेलर पलटी झाला असून सदर कंटेनर दास्तानफाटा ते गव्हाणफाटा उड्डान पुलाचे काम चालू आसल्याच्या ठिकाणी महामार्गाच्या खाली ५० फूट रस्त्याच्या खाली पलटी झाला. सूदैवाने ट्रेलरचा चालक व क्लिनर या अपघातातून सूखरुप बचावला. परंतू सदर अपघात बघता ट्रेलर चालकांचा बेजबाबदारपणा पुन्हा एकदा समोर आला आहे.

या बाबत हाकीगत अशी की, २० टन सामान भरलेला कंटेनर घेवून ट्रेलर क्रमांक एम एच ४६ बिबि ७३९७ हा जेएनपिटीच्या दिशेने जात होता.परंतू अच–ानक ट्रेलर चालकाचा ताबा सूटल्याने सदर ट्रेलर हा मूख्य रस्ता ओलांडून सर्वीस रस्त्यावर आला.व तिथून तो सर्वीस रस्ता ओलांडून रस्त्याच्या कडेने ५० फूट खाली घसरला.ज्या जागेवर तो घसरला तिथे उड्डान पूलाचे कामकाज चालू होते.तर स्त्यावरही वहानांची वर्दळ होती.

परंतू सूदैवाने ट्रेलरचा चालक व क्लिनर या अपघातातून बचावले, तसेच कोणतीही जिवित हानी झाली नाही. परंतू या अपघातामूळे जेएनपीटी मार्गावर निष्काळजी पणामूळे होणाऱ्या आणखी एका अपघाताची भर पडली.त्यामूळे त्या रस्त्यावर वारंवार होणारा अपघात पाहता अपघात रोखण्याची कोणतीही सुरक्षा उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे.







## कु.गौरी (झुन्नू) नितीन पाटील

### हिला वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

✻ शुभेच्छुक ✻

ह.भ.प.धाऊ आंबो पाटील (आजोबा) | ह.भ.प.सौ.वनिता धाऊ पाटील (आजी)
ह.भ.प.नितीन धाऊ पाटील (पप्पा) | ह.भ.प.सौ.मिरा नितीन पाटील (मम्मी)
श्री.संतोष तुकाराम पाटील (आजोबा) | सौ.सारिका संतोष पाटील (आजी)
ह.भ.प.सौ.मिनाक्षी शिवदास पाटील (आत्या सांगडे) | सौ.सोनु कृष्णा पाटील (आत्या कोप्रोली)
ह.भ.प.सौ.नेहा गणेश पाटील (आत्या घोडीवली) | कु.काजल धाऊ पाटील (छोटी आत्या)

✻ मावशी ✻

ह.भ.प.सौ.पिंकी विनोद पाटील (आकुर्ली) | सौ.विद्या रोशन पाटील (चिखले)
ह.भ.प.सौ.मुक्ता सुनील पाटील (घोट) | सौ.जयश्री अभिजीत देशपांडे (पोयंजे)
सौ.दिव्या अविनाश पवार (बेलवली)

मामा : ओमकार (बच्चू), विकी, प्रणय, देवेश, हर्ष, पिंट्या (भाऊ) चिखले

छोटे मास्टर : पार्थ (कुकू), माऊली सांगडे, स्मरण, चिन्मय (कोप्रोली), ओवी, कायरा (मोहो), वेद, भावेश, ओवी, आहान (ओवळे), सई (कळंबोली), आर्या, तुषार (आकुर्ली)

दि.५/३/२०२२ रोजी सायंकाळी ७.३० वाजता

पत्ता : सुरमाळ क्रिकेट मैदान, वाजे, ता.पनवेल, जि.रायगड



महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग

## कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय

रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड
सार्वजनिक बांधकाम आवार–पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन–४०२१०७

जा.क्र.का.अ./राविवि/निविदा–२/५३२/सन २०२२ — दिनांक : ०२/०३/२०२२

निविदा सूचना क्र. 15 सन 2021-22

संदर्भ : 1. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी 2017/प्र.क्र.8/इमारती-2 दिनांक 27 सप्टेंबर 2018
2. महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.सीएटी 2017/प्र.क्र.8/इमारती-2 दिनांक 20 मे 2021

**कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-402107 दुरध्वनी क्र.02143- 299288 यांचेकडुन** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-1 नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) निविदा ऑनलाईन प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-402107 दुरध्वनी क्र.02143- 299288** यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Est No.PESD/OW/ 4679 /2021-22 Providing CCTV system for the premises at Civil Court Junior Division, Pen Tal-Pen, Dist-Raigad. | रु. 6,24,210/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 6300/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 02 | Est No.PESD/OW/ 4680 /2021-22 Providing CCTV system for the premises at Civil Court Senior Division, Panvel Tal-Panvel Dist-Raigad. | रु. 6,30,600/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 6400/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 03 | Est No.PESD/OW/ 4681 /2021-22 Providing CCTV system for the premises at Civil Court Junior Division, Uran Tal-Uran Dist-Raigad. | रु. 6,24,260/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 6300/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 04 | Est No.PESD/OW/ 4684 /2021-22 Providing CCTV system for the premises at Civil Court Junior Division, Pali Tal-Pali Dist-Raigad. | रु. 6,27,066/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 6300/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 05 | Est No.PESD/OW/ 4685 /2021-22 Providing cable mains & switchgear to pump room & mortuary in District Hospital Alibag, Dist-Raigad. | Rs. 3,38,257/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 3400/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 06 | Est No.PESD/OW/ 4686 /2021-22 Providing CCTV System at Rural and Truama care Hospital Mahad, Tal-Mahad, Dist-Raigad. | Rs. 6,24,260/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 6300/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |
| 07 | Est No.PESD/SR/ 806 /2021-22 Providing Renovation EI at ITI Shriwardhan, Tal-Shriwardhan, Dist-Raigad. | Rs. 4,40,401/- | दिनांक 09.03.2022 सकाळी 11:00 वाजेपासुन दिनांक 23.03.2022 सायंकाळी 18:00 वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही. ठेकेदारांचा वर्ग ड व त्यावरील नोंदणीकृत विद्युत ठेकेदार ज्यांना अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. इसारा रक्कम रु. 4500/- निविदा शुल्क रु. 500/- अधीक वस्तु व सेवा कर एकुण रु. 560/- | दिनांक 25.03.2022 सकाळी 11:00 |

1. https://mahapwd.gov.in (Pay PWD Online) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
2. कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां.रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां.परिसर-पेण, ता.पेण, जि.रायगड, पिन कोड-402107 दुरध्वनी क्र.02143- 299288 या कार्यालयातील सुचना फलक
3. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामधील नोंदणीधारक वरील निर्देशित विद्युत अनुज्ञप्तीधारक ठेकेदारच निविदा सादर करु शकतात अन्य ठेकेदाराने सादर केलेली निविदा स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

( स.का.पाटील )
कार्यकारी अभियंता,
रायगड विद्युत विभाग,
सा.बां.पेण-रायगड.

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/२५४/३५२/२०२२